## नि.दि.मु.क्र.११०/२०१२ मधील निशाणी क्र.१४८ वरील आदेश

## (**CNRNo.MHSI**080004852012)

०१. प्रस्तूत अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.५ रघुनाथ तुकाराम कदम, प्रतिवादी क्र.६अ मधुकर सिताराम कदम व प्रतिवादी क्र.१३ शांताराम दत्ताराम कदम यांचे कायदेशीर वारस मुदतीत रेकॉर्डवर न आणल्याने प्रतिवादी क्र.५, ६अ व १३ विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होऊन मिळणेकरीता विनंती केली आहे. वादी यांचे कथनानुसार, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.५ हे दि.०४/०६/२०२१, प्रतिवादी क्र. ६अ दि.१३/१२/२०२१ व प्रतिवादी क्र.१३ हे दि.२८/०४/२०२१ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.५, ६अ व १३ यांचे मुदतीत रेकॉर्डवर आणणे आवश्यक होते. वादी हे भोम येथे वास्तव्यास असल्याने व वर नमुद प्रतिवादी हे त्यांचे संपर्कात नसल्याने ते मयत असल्याबाबत वादींना कोणतीही माहिती नाही. अलीकडेच नातेवाईकांमार्फत सदर प्रतिवादी मयत असल्याबाबत वादी यांना माहिती मिळाली. प्रतिवादी क्र.५ चे वारस अभिलेखावर आणणेस विलंब झाल्याने दावा प्रतिवादी क्र.५, ६अ व १३ विरुध्द अबेट झाला आहे. सबब, प्रस्तूत प्रतिवादी क्र.५, ६अ व १३ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करुन मिळणेबाबत वादी यांनी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे नि.क्र.१६७ येथे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत अर्ज खोटा व खोडसाळ आहे. प्रतिवादी क्र.५, ६अ व १३ हे मयत असल्याबाबतची माहिती वादी यांना होती तरी देखील त्यांनी सदर प्रतिवादींचे वारस अभिलेखावर आणणेस निष्काळजीपणा व दिरंगाई केली

आहे. वादीच्या निष्काळजीपणामुळे सदर विलंब झाला आहे. वादी यांनी अर्जात कोणतेही योग्य व समर्पक कारण दिलेले नाही. सबब, अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, उभय पक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता अर्जात नमुद कारणे ही योग्य असल्याचे दिसून येते. प्रस्तूतचा दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. परीणामी, दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

– **आदेश –**

१. निशाणी क्र.१४८ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.५, ६अ व १३ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश वादीने प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना रक्कम रु.५००/– खर्च देण्याच्या अटीवर न्यायपुर्ततेकरीता रद्द करण्यात येत आहे.

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2026.03.11 17:31:57 +0530

(शुभम जी. लटुरिया)

दिनांक : ११/०३/२०२६

न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय, वैभववाडी